**'स्थापत्य अभियांत्रिकी सहायक' या पाठ्यक्रमाशी आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठ्यक्रम समकक्ष ठरवण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्र.सेप्रनि-१००८/प्र.क्र.५९/आस्थापना-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १३ ऑगस्ट, २००८.

**वाचाः-** १) शासन अधिसूचना, सा.बां.विभाग, क्र.आरटीआर-१०८९/१२६०/आस्था-२, दि. १८/६/९८.
२) सा.बां.विभाग आदेश क्र.सेप्रनि-१००७/प्र.क्र.३२/आस्था-२, दिनांक २६/९/२००७.
३) शासन अधिसूचना, सा.बां.विभाग, क्र सेप्रनि-१००७/२०६/आस्था-२, दि. ७/३/२००८.
४) शासन निर्णय,सा.बां.विभाग,क्र.सेप्रनि/१००७/प्र.क्र.३२/आस्था-२, दिनांक ११/३/२००८.

**<u>शासन निर्णयः-</u>**

२. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आस्थापनेवरील 'स्थापत्य अभियांत्रिकी सहायक' या पदाचे सेवाप्रवेश नियम शासनाच्या क्र.आरटीआर/१०८९/१२६०/आस्थापना २, दिनांक १८/६/१९९८ अन्वये अधिसूचित करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेच्या नियम ३ (ब) (२) मध्ये या पदासाठी विहित केलेली 'स्थापत्य अभियांत्रिकी सहायक' हा एक वर्षाचा पाठयक्रम ही अर्हता धारण केलेले उमेदवार सदर पाठयक्रम बंद झाल्यामुळे उपलब्ध होत नव्हते. म्हणून सेवा प्रवेश नियमांमध्ये, उपरोक्त क्र (३) येथील दि.७/३/२००८ च्या अधिसूचनेद्वारे सदर पदासाठी किमान स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण ही अर्हता किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता,अशी सुधारणा करण्यात आली. त्यानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदासाठी समकक्ष अर्हता ठरविण्याकरिता शासनस्तरावर दि. २६/९/२००७ च्या शासन आदेशान्वये विभागांतर्गत समिती स्थापन करण्यात आली. सदर समीतीस व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने पाठ्यक्रमांची माहिती पुरविली. सदर माहितीची छाननी केल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार शासन निर्णय क्र.सेप्रनि/१००७/प्र.क्र.३२/आस्थापना-२, दि.११/३/२००८ अन्वये 'वास्तुशास्त्रीय आरेखक' व 'बांधकाम पर्यवेक्षक' हे दोन पाठयक्रम समकक्ष घोषित करण्यात आले आहेत. तद्नंतर, 'स्थापत्य अभियांत्रिकी सहायक' या पाठ्यक्रमाशी 'आरेखक (स्थापत्य) ' हा पाठ्यक्रम समकक्ष आहे किंवा कसे, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. सदर प्रस्तावाच्या संदर्भात व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभिप्राय घेऊन ते विभागांतर्गत समितीसमोर छाननीसाठी ठेवण्यात आले होते. सदर समितीने

याबाबत सर्वकष विचारविनिमय करुन, 'आरेखक (स्थापत्य) ' हा दोन वर्षाचा पाठयक्रम, 'स्थापत्य अभियात्रिकी सहायक' या पाठयक्रमाशी समकक्ष धरण्याबाबत शासनास शिफारस केली. शासनाने ती शिफारस मान्य केली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आस्थापनेवरील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक हे पद सरळसेवेने भरण्यासाठी 'आरेखक (स्थापत्य) ' हा दोन वर्षाचा पाठयक्रम स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पाठयक्रमाशी समतुल्य समजण्यात यावा, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (**www.maharashtra.gov.in**) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०८१३१२०९१०००१ असा आहे.

हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( को. रा. गिरासे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई.
सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
किनारी अभियंता, मुंबई.
संचालक, उपवने व उद्याने, मुंबई.
संचालक, विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई.
प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादीत, मुंबई.
स्वीय सहाय्यक, सचिव (बांधकामे), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई.
स्वीय सहाय्यक, सचिव (रस्ते), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
कार्यासन, आस्थापना-२ (निवडनस्ती), सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई.